# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 01/02/2023 (बुधवार) सायंकाळ

---

## अवैध रेती चोरी करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद

## स्थानिक गुन्हे शाखेची कार्यवाही

दिनांक ०१/०२/२०२३ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक कन्हान उपविभागात पेट्रोलिंग करीत असतांना मुख्यबिरव्दारे खबर मिळाली की, पोलिस ठाणे खापरखेडा हद्दीतील ०४ किमी अंतरावर वारेगाव येथे अवैधरीत्या विनापरवाना रेतीची (गौणखनिज) टिप्पर व्दारे चोरटी वाहतुक होत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहितीवरून स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पारशिवनी रोडकडुन येणाऱ्या टिप्पर क्र. एम.एच–४०/एन–७९१५ च्या चालकाला थांबवून तपासले असता सदर वाहनात टिप्पर चालक व आरोपी नामे–१) दिनेश शामराव उपवंशी, वय १८ वर्ष, रा. वार्ड क्रमांक ९ सिद्धार्थ नगर कोराडी नागपूर मालक नामे– २) उदयभानजी सूर्यवंशी, रा. वंजारी भवन कोराडी हे टिप्परमध्ये अवैधरीत्या रेतीची चोरी करतांना मिळुन आल्याने त्यांच्या ताब्यातून टिप्पर क्र. एम.एच–४०/एन–७९१५ किंमती अंदाजे २०,०००००/– रू, असुन टिप्परमध्ये चार ब्रास रेती किंमती अंदाजे १६,०००/– रू असा एकुण २०,१६०००/– रूपयाचा मुद्देमाल आरोपीतांच्या ताब्यातुन जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरकारतर्फे फिर्यादी नामे– पोलीस नायक ब. नं. २४५ विरेंद्र नरड स्थानिक गुन्हे शाखा यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीतांविरुध्द कलम ३७९, १०९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपी क्र. १) याला अटक करण्यात आली असुन पुढील कायदेशीर कारवाई करीता पोस्टे खापरखेडा यांचे ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कार्यवाही नागपुर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक श्री. डॉ. संदिप पखाले यांचे मार्गदर्शनात, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे, पोलीस हवालदार गजेंद्र चौधरी, रोशन काळे, पोलीस नायक विरेंद्र नरड, रोहन डाखोरे, विपीन गायधने, चालक पोलीस हवालदार अमोल कुथे यांचे पथकाने केली.



पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर